RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

बुधवार,२६ फेब्रुवारी २०२५ | वर्ष : ५ | अंक : ६३ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Wedneday, 26 February 2025 | Year : 5 | Issue : 63 | Daily | Rate: Rs. 5/-







# डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाचे चार भारतीय कंपन्यांवर निर्बंध

**नवी दिल्ली :** अमेरिकेकडून इराणव गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर निर्बंध लादण्यात आले आहेत. याच निर्बंधांचा एक भाग म्हणून इराणमधून निर्यात होणाऱ्या तेलाची वाहतूक करणाऱ्या संलग्न कंपन्यांनाही आता ट्रम्प प्रशासनाने लक्ष्य करायला सुरुवात केली आहे. प्रामुख्याने यात इराणमधून निर्यात होणारे कच्चे तेल आणि पेट्रोलियमची उत्पादने यांचा समावेश आहे. अशी वाहतूक करणाऱ्या कंपन्यांची यादीच अमेरिकेने तयार केली असून त्यांच्यावर कडक निर्बंध लादण्यात आले आहेत. त्यात भारतातील चार कंपन्यांचा समावेश आहे. यापैकी एक कंपनी नवी मुंबईतील आहे.



भारतातील निर्बंध लादण्यात आलेल्या चार कंपन्यांचा इराणमधून निर्यात होणाऱ्या तेलाची वाहतूक करण्यात सहभाग असल्याचा आरोप अमेरिकेकडून करण्यात येत आहे. इराणवर 'सर्वाधिक निर्बंध मोहीमे' अंतर्गत ही पावले ट्रम्प प्रशासनाकडून उचलण्यात येत आहेत. निर्बंधांच्या यादीत एकूण 30 कंपन्या वा तेलवाहतूक करणाऱ्या जहाजांचा समावेश आहे. ही जहाजे वेगवेगळ्या देशांमधली आहेत.

भारतीय कंपन्यांवर अमेरिकन प्रशासनाकडून अशा प्रकारे निर्बंध लादले जाण्याची ही पहिलीच वेळ नाही. उदाहरणार्थ, ऑक्टोबरमध्ये भारतातील गब्बारो शिप सर्व्हिसेस या कंपनीवर बंधनं लादण्यात आली. ऑगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यांत आणखी तीन कंपन्यांवर निर्बंध लादण्यात आले.

## नवी मुंबईतील कंपनीवर निर्बंधांची कारवाई!

दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने निर्बंध घातलेल्या कंपन्यामध्ये 4 भारतीय कंपन्या आहेत. त्यात नवी मुंबईतील फ्लक्स मेरिटाईम एलएलपी (Flu& Maritime LLP), दिल्ली एनसीआरमधील बीएसएम मरीन एलएलपी (BSM Marine LLP) व ऑस्टिनशिप मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड (Austinship Management Pvt Ltd) तर तंजावरमधील कॉसमॉस लाईन्स इंक (Cosmom Lines Inc.) या कंपन्यांचा समावेश आहे. यापैकी तीन कंपन्या या इराणमधून निर्यात होणाऱ्या तेलाची वाहतूक करणाऱ्या जहाजांच्या व्यावसायिक वा तांत्रिक व्यवस्थापक असल्याच्या आरोप आहे, तर कॉसमॉस लाईन्स या कंपनीवर इराणच्या पेट्रोलियम उत्पादनांची वाहतूक केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे

> आज निर्बंध लादण्यात आलेल्या कंपन्यामध्ये यूएई व हाँगकाँगमधील तेलाच्या दलाल कंपन्या, भारत व चीन मधील टँकर मॅनेजर कंपन्या, इराणच्या नॅशनल इरानियन ऑईल कंपनीचे प्रमुख यांचा समावेश आहे. याशिवाय इराणच्या लाखो बॅरल तेलाची वाहतूक करणाऱ्या काही जहाज कंपन्यांवरही निर्बंध लादण्यात आले आहेत अशी माहिती अमेरिकेच्या ऑफिस ऑफ फॉरेन ॲसेट्स कंट्रोल अर्थात OFAC कडून देण्यात आली आहे.

# उत्तराखंडमध्ये भाजपाचे अर्थमंत्री अडकले वादाच्या भोवऱ्यात

**देहरादून :** उत्तराखंडचे अर्थमंत्री आणि भाजपाचे नेते प्रेमचंद अग्रवाल यांनी 'मैदानी विरुद्ध पहाडी' या विषयावर बोलताना शुक्रवारी विधानसभेत आक्षेपार्ह विधान केले. त्यांच्या या विधानामुळे मोठा वाद निर्माण झाला असून विरोधकांनी राज्यभरात आंदोलने केली आहेत. प्रक्षोभक विधाने करणाऱ्या अर्थमंत्र्यांची तातडीने मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, अशी मागणी काँग्रेसच्या नेत्यांनी जोरकसपणे लावून धरली आहे. सरते शेवटी या वादावर पडदा टाकण्यासाठी प्रेमचंद अग्रवाल यांनी माफीही मागितली आहे.



परंतु, त्यांच्या वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय वातावरण तणावपूर्ण झाले आहे. विधानसभेतील विरोधी पक्षनेते यशपाल आर्य यांनी सांगितले की, 'डोंगराळ भागात राहणाऱ्या नागरिकांविषयी असे विचार आणि धारणा सभागृहाच्या प्रतिष्ठेच्या विरुद्ध आहे. अर्थमंत्र्यांवर तातडीने कारवाई व्हायला हवी, आम्ही काँग्रेस कार्यकर्त्यांना आंदोलने करतांना काळजी घेण्यास सांगितली आहे.

अर्थमंत्री प्रेमचंद अग्रवाल हे शुक्रवारी विधानसभेत भाषण करत होते. यावेळी काँग्रेसच्या आमदारांनी त्यांच्यावर 'पहाडी' लोकांविरोधात बोलण्याचा आरोप केला. तेव्हा अर्थमंत्री म्हणाले, 'उत्तराखंड फक्त डोंगराळ प्रदेशातील लोकांसाठी आहे का? डोंगराळ प्रदेशात कोण राहतात? या ठिकाणी राहणारे काही लोक हे मध्य प्रदेशातून आले आहेत, तर काही राजस्थानमधील आहेत. तुम्ही (काँग्रेस आमदार) लोकांना कुमाऊं, गढवाल, पहाडी आणि देसीमध्ये विभागत आहात. वरिष्ठ नेत्यांच्या जवळ बसून टोमणे मारत आहात. मी अग्रवाल असल्यामुळे आपण माझ्या विधानावर आक्षेप घेत आहात, हे योग्य नाही.'

मंगळवारी, उत्तराखंड विधानसभेच्या अधिवेशनाची सुरुवात काहीशी वादग्रस्त झाली होती. कारण काँग्रेसचे आमदार राज्यपालांच्या अभिभाषणावर आक्षेप घेत होते. या दरम्यान, मंत्री प्रेमचंद अग्रवाल आणि काँग्रेसचे द्वाराहाटचे आमदार मदन बिष्ट यांच्यात वादही झाला. सभागृहातील वातावरण तापत असताना, विधानसभा अध्यक्षा रितू खंडुरी यांनी सर्वांना शांत राहण्याचे आवाहन केले. त्या म्हणाल्या, 'आपण (काँग्रेस आमदार) रस्त्यावर असल्यासारखे लढत आहात. संपूर्ण देशाचे लक्ष आपल्या सभागृहाकडे आहे. उत्तराखंडमधील नागरिकही भांडणे पाहत आहेत. हे सभागृह एक मंदिर असून येथे असा वाद होणे दुर्दैवी आहे.' *'उत्तराखंडला राज्याचा दर्जा मिळावा यासाठी अनेकांनी आंदोलने केली आणि लढाही दिला. असे असूनही आपल्याला वारंवार अशा लढाईचा सामना करावा लागत आहे. तुम्ही सर्व जण अनेकवेळा निवडून आला आहात. सभागृहाची माहिती असूनही इथे वाईट गोष्टी बोलणे चुकीचे आहे'*, असे म्हणत रितू खंडुरी यांनी विधानसभेचे कामकाज थांबवले.

# लाडकी बहीण योजनेतील 9 लाख लाभार्थी महिलांना पैसे मिळणार नाहीत : प्रणिती शिंदे

**मुंबई :** महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आले आहे. महायुतीला 237 जागा मिळाल्या आहेत. आम्हाला हे यश लाडक्या बहिणींमुळे असे सरकारने सांगितले. तसेच ही योजना बंद होणार नाही असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. दरम्यान खासदार प्रणिती शिंदे यांनी लाडकी बहीण योजनेतून 9 लाख लाभार्थी महिलांना वगळण्यात येणार आहे असा आरोप केला आहे. लाडकी बहीण योजना सुरु केल्यानंतर 40 ते 45 हजार कोटींचा भार बजेटवर आल्याने फिस्कल स्पेस कमी झाली आहे. मात्र लाडकी बहीण योजना बंद करणार, ही योजना बंद करणार, ती योजना बंद करणार



आम्ही कुठलीही योजना बंद केलेली नाही. ज्या योजना सुरु आहेत त्या चालवणारच आहोत. मी हेदेखील अधिकाऱ्यांना सांगितले की रिव्हर्स गणित मांडा की आपली प्रगती करण्यासाठी किती गुंतवणूक करायची आहे? किती करु शकतो? 25 हजार कोटींचा फरक पडत असेल तर ते आपण केंद्राकडून विविध योजनांमधून आणता येईल का? याचा विचार आम्ही करतो आहोत. महसुली तूट वाढते आहे म्हणून भांडवली खर्च कमी करायचा या ट्रॅपमध्ये आम्हाला जायचे नाही असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते. दरम्यान प्रणिती शिंदेंनी सरकारवर आरोप केला आहे. महाराष्ट्राची तिजोरीच अडचणींत सापडली आहे. 9 लाख लाभार्थी लाडक्या बहिणींना पैसे मिळणार नाहीत. हे होणार होते हे माहीतच होते. कारण लाडकी बहीण योजनेकडे पैसे वळवल्याने पी एम किसान योजना, संजय गांधी निराधार योजना या सगळ्या योजनांचे पैसे देणे बंद आहे.

# महिलांना एसटी प्रवासात मिळणारी सवलत बंद होणार का?

**मुंबई :** महायुती सरकारमधील परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काही दिवसांपूर्वी एका कार्यक्रमात बोलताना राज्यातील महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना एसटीच्या बस प्रवासात दिलेल्या सवलतींमुळे एसटी तोट्यात असल्याचे मोठे विधान केले होते. त्यांच्या या विधानामुळे चर्चांना उधाण आले होते. त्यामुळे एसटीच्या प्रवासात महिलांना दिली जाणारी 50 टक्के सवलत बंद होणार का? याबाबत चर्चा रंगल्या होत्या. या चर्चासंदर्भात आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्टीकरण दिल आहे. 'एसटी महामंडळ च्याबाबतीत आणि राज्याच्या हिताच्या



अनुषंगाने मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना एकनाथ शिंदे यांनी जे काही निर्णय घेतलेले आहेत. त्या निर्णयात कोणताही बदल करण्यात येणार नाही. तसेच ज्या योजना एकनाथ शिंदे यांनी सुरु केलेल्या आहेत त्या योजनेत देखील कोणताही बदल होणार नाही. तसेच एसटीच्या प्रवासात महिलांना 50 टक्के सवलत देण्याचा निर्णय देखील त्यांच्या कार्यकाळात झाला होता. तसेच 75 वर्षांच्या पुढील जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाचा निर्णय झाला होता. आता या निर्णयात कुठेही बदल होणार नाही', अशी माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

## शीख विरोधी दंगल प्रकरणात सज्जन कुमार यांना जन्मठेप

**नवी दिल्ली :** 1984 मध्ये ज्या शीख विरोधी दंगली दिल्लीत उसळल्या त्या प्रकरणी काँग्रेसचे माजी खासदार सज्जन कुणार यांनी दिल्लीच्या राउज ॲव्हेन्यू न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.



सज्जन कुमार यांना 1 नोव्हेंबर 1984 या दिवशी सरस्वती विहार या ठिकाणी झालेल्या वडील मुलाच्या हत्येप्रकरणी न्यायलयने दोषी ठरवले होते. 12 फेब्रुवारीला हा निर्णय न्यायालयाने दिला होता. त्यानंतर आज त्यांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. सज्जन कुमार यांना फाशी देण्याची मागणी या प्रकरणात सीबीआय आणि तक्रारदारांनी सज्जन कुमार यांना फाशी देण्याची मागणी केली होती. मात्र रोज ॲव्हेन्यू न्यायालयाने सज्जन कुमार यांना 12 फेब्रुवारीला दोषी ठरवले होते आणि आज त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे

## अंबानी-अदाणी आसाममध्ये 1,00,000 कोटी गुंतवणार

**गोहाटी :** ईशान्य भारतातील राज्य आसाम अलीकडच्या काळात वेगाने विकसित होत आहे. आसामच्या विकासाचा हा वेग आता आणखी वाढणार आहे. 'ॲडव्हान्टेज आसाम 2.0 इन्व्हेस्टमेंट अँड इन्फ्रास्ट्रक्चर समिट 2025' या परिषदेला सुरुवात झाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. आसामचे राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य व मुख्यमंत्री हिमंत विश्व शर्मा यावेळी उपस्थित होते. या बिझनेस समिटमध्ये रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी, अदाणी समूहाचे प्रमुख गौतम अदाणी, जेएसडब्ल्यू समूहाचे सज्जन जिंदाल, एस्सारचे प्रमुख प्रशांत रुइया, वेदांताचे अनिल अग्रवाल यांच्यासह देश-विदेशातील अनेक मोठमोठे उद्योजक सहभागी झाले आहेत. दोन्ही उद्योजकांनी आसाममध्ये प्रत्येकी 50 हजार कोटी रुपये गुंतवणार असल्याचं जाहीर केलं आहे. रिलायन्स व अदाणी समूह राज्यात 1,00,000 कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहेत.

# दिल्ली विधानसभेत आपच्या आमदारांचा गदारोळ

## आतिशी यांच्यासह 12 आमदारांचे निलंबन

**नवी दिल्ली :** दिल्लीत भाजपाने 48 जागी विजय मिळवत एकहाती सत्ता काबीज केली आहे. दरम्यान 27 फेब्रुवारीपर्यंत विशेष अधिवेशन असणार आहे. राज्यपालांच्या अभिभाषणा दरम्यान आप म्हणजेच आम आदमी पार्टीच्या आमदारांनी जोरदार गदारोळ केला. ज्यानंतर दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष विजेंद्र गुप्ता यांनी आपच्या 12 आमदारांचे निलंबन केले आहे. ज्या 12 आमदारांचे एक दिवसासाठी निलंबन करण्यात आले त्यात विरोधी पक्षनेत्या आणि माजी मुख्यमंत्री आतिशी यांचाही समावेश आहे. दिल्ली विधानसभेत गदारोळ करणाऱ्या जुबेर अहमद, वीरेंद्र सिंह कादियान यांच्यासह विरोधी पक्ष नेत्या आतिशी अशा एकूण 12 आमदारांचे एक दिवसासाठी निलंबन करण्यात आले आहे. दिल्ली विधानसभेत आज कॅगचा अहवाल समोर येणार आहे. या अहवालात शीशमहलच्या दुरुस्ती आणि देखभाल खर्चाचे तसेच नुतनीकरणाच्या खर्चाचे तपशील आहेत. ज्यावरुन कॅगने आधीच्या सरकारला झापलं आहे. त्यावरुन आपमच्या आमदारांनी हंगामा केला. तसेच दिल्ली विधानसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो हटवून प्रधानमंत्री मोदींचा फोटो त्या ठिकाणी लावण्यात आला. या दोन्ही मुद्द्यांवरुन गदारोळ सुरु आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपेक्षा मोठे आहेत का? असा सवाल माजी मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेत्या आतिशी यांनी केला आहे. कॅगचा अहवाल सादर होण्याआधीच विधानसभेत गदारोळ पाहण्यास मिळाला. ज्यानंतर विधानसभेच्या अध्यक्षांनी विरोधी पक्ष नेत्या आतिशी यांच्यासह एकूण 12 आमदारांचे एक दिवसासाठी निलंबन केले. आपच्या प्रवक्त्या प्रियांका कक्कड यांनी म्हटले आहे की कॅगचा अहवाल येणे ही फक्त औपचारिकता आहे. आमच्या सरकार आले असते तरीही आज आम्ही हा अहवाल आणलाच असता.

> भाजपाने त्यांचा खरा चेहरा संपूर्ण देशाला सोमवारी दाखवला. दिल्ली विधानसभा आणि दिल्ली सचिवालय या ठिकाणी असलेल्या मुख्यमंत्री कार्यालय आणि इतर कार्यालयांमध्ये असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो हटवून त्या ठिकाणी प्रधानमंत्री मोदींचा फोटो लावण्यात आला आहे. भाजपाच्या लोकांना वाटते की प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जागा घेऊ शकतात त्यामुळेच हे करण्यात आले.
>
> - माजी मुख्यमंत्री आतिशी



# गर्भातील बाळासह आदिवासी महिलेचा मृत्यू

**भंडारा :** प्रसूती कळा असह्य झाल्यामुळे गर्भवती महिला प्राथमिक आरोग्य केंद्रात आली. डॉक्टरांनी प्रसुतीला वेळ आहे असे सांगून 'तिला' घरी परत पाठवले. दुसऱ्या दिवशी तिला तीव्र प्रसूती कळा सुरू झाल्याने तुमसर उप जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रसूती दरम्यान बाळाचा आणि मातेचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संतापाची लाट पसरली असून डॉक्टरांच्या चुकीने निष्पाप मायलेकाचा जीव गेल्याचे हळहळ व्यक्त केली जात आहे. तुमसर तालुक्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या नाकाडोंगरी प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येत असलेल्या आष्टी येथील नऊ महिन्याच्या गरोदर महिलेचा गर्भातील बाळासह तुमसर उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना 24 फेब्रुवारी 2025 रोजी रात्री एक वाजतादरम्यान समोर आली. सुनिता दुर्गेश सोयाम (24) रा.आष्टी ता. तुमसर, असे मृतक गरोदर आदिवासी महिलेचे नाव आहे. सुनिता सोयाम या नऊ महिन्यांच्या गरोदर महिलेला एक दिवसाअगोदर तिला प्रसुतीच्या कळा सुरू झाल्या होत्या. दरम्यान तिच्या पतीने प्रथम प्राथमिक आरोग्य केंद्र नाकाडोंगरी येथे उपचारासाठी दाखल केले होते. परंतू येथील डॉक्टरांनी तिच्या प्रसुतीला वेळ आहे म्हणून घरी पाठविले होते. दरम्यान दुसऱ्या दिवशी सुनिताला प्रसुतीच्या तीव्र वेदना झाल्या त्यावेळी उपचारार्थ तुमसर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथील डॉक्टरांनी तिला रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. परंतू उपचारादरम्यान गरोदर महिलेच्या गर्भातील नऊ महिन्याच्या बाळासह मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली.



# राज्यातील 17 लाख कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात वाढ

## कास्ट्राईबच्या मागणीला यश

**राज्य कर्मचाऱ्यांनी विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया पारदर्शी व यशस्वीपणे पार पाडली तसेच लाडकी बहीण योजना देखील यशस्वीपणे राबविल्यामुळे 1 जुलै 2024 पासून 3 टक्के महागाई भत्ता लागू करण्याची मागणी कास्ट्राईब जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे डॉ. सोहन चवरे व सचिव नरेंद्र धनविजय यांनी शासनाला केली होती. अखेर कास्ट्राईबच्या मागणीला यश आले आहे.**



**नागपूर :** तुम्ही सरकारी कर्मचारी असाल किंवा तुमच्या मित्र-परिवारात सरकारी नोकरी करणारी व्यक्ती असेल तर लवकरच तुम्हाला आनंदवार्ता मिळेल. सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार, केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात 3 टक्के वाढ होणार आहे. परंतु, त्यापूर्वीच महाराष्ट्र शासनाने राज्य कर्मचाऱ्यांना आनंदाची वार्ता दिली आहे. राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

25 फेब्रुवारीच्या शासन निर्णयानुसार 1 जुलै, 2024 पासून 7 व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर 50 टक्क्यांवरुन 53 टक्के करण्यात आला आहे. सदर महागाई भत्ता वाढ 1 जुलै 2024 ते 31 जानेवारी 2025 या कालावधीतील थकबाकीसह माहे फेब्रुवारी 2025 च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावा, असे आदेश देण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या धरतीवर राज्य कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभ देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. दरवर्षी 1 जानेवारी व 1 जुलै पासून केंद्र शासन केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करीत असते. 1 जुलै पासून केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांना 2 टक्के महागाई भत्ता लागू केला त्यानंतर राज्य सरकारने देखील दिवाळीमध्ये राज्य कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू करणे अपेक्षित होते व कर्मचाऱ्यांना मोठी अपेक्षा होती. दरम्यानच्या काळात विधानसभा निवडणुका घोषित झाल्या व आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली. विधानसभा निवडणूक झाली व नवीन सरकार सत्तेवर आले आता तरी नवीन वर्षात प्रलंबित असलेला महागाई भत्ता राज्य सरकार घोषित करेल अशी अपेक्षा होती. मात्र हा निर्णय न झाल्यामुळे राज्यातील 17 लाख राज्य व जिल्हा परिषदेचे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीची भावना पसरली होती. ज्या कर्मचाऱ्यांनी लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबवली तेच कर्मचारी आर्थिक अधिकारापासून वंचित आहेत, असा आरोपही होत होता. अखेर शासनाने महागाई भत्ता 3 टक्के वाढ केल्याने कर्मचाऱ्यांच्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## चला आपला बहुजन सौरभ बलशाली करू या!

आपल्या बहुजन समाजातील महापुरुषांच्या विचारांवर आपण सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

त्यांच्या जयंती निमित्त आपण वैयक्तीक अथवा मित्रांच्या/ संस्था/संघटनेची शुभेच्छा जाहिरात स्वरूपात देऊन दैनिक बहुजनसौरभला आर्थिक सहकार्य करावे!




वर्तमानपत्रात बातम्या, लेख, कथा, कविता हवे असते तसेच जाहिराती गरजेच्या असतात हे लक्षात घेऊन आपण आपल्या कुटुंबातील सदस्याचे जयंती-स्मृतीदिन, वाढदिवस, सण, उत्सव, व्यवसाय, उत्पादने इत्यादी अनेक बाबतीत आपल्या समाजातील उद्योजक व व्यवसायिक यांनी जाहिरात देऊन किंवा जसे शक्य आहे तसे आर्थिक मदत केली तरच आपण आपलाच मिडीया बलशाली करू शकतो!

मुख्य संपादक, दैनिक बहुजन सौरभ

“ वाचन हे ज्ञानाच्या सागराचे द्वार आहे. ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# संपादकीय

## शेतकरी जगला पाहिजे ही काळाची गरज...

स्वातंत्र्यपूर्वी आपल्याकडे उत्तम शेती, मध्यम व्यवसाय, आणि कनिष्ठ नोकरी असे म्हटले जायचे. त्यावेळी शेती हा उत्तम व्यवसाय समजला जायचा. मात्र गेल्या 6 दशकांमध्ये शेतीची परिस्थिती घसरत गेली आहे, आणि शेतकरी कंगाल झालेला बघायला मिळतो आहे. त्याला कारणही बरीच आहेत. पूर्वी एकेका कुटुंबाकडे शेकडो एकर जमीन असायची. मात्र कमाल जमीन धारणा कायदा आला आणि एका कुटुंबाकडे फक्त 56 एकर जमीन ठेवली गेली. ज्यावेळी हा कायदा आला त्यावेळी एकच कुटुंब होते. मात्र नंतर हळूहळू एका कुटुंबात 2 किंवा 3 भाऊ वेगळे झाले आणि प्रत्येकाच्या वाट्याला 18-19 एकर जमीन आली. त्यातही अडचणी सुरू झाल्या. गेल्या जवळजवळ 100 वर्षात जगभरात जो काहीम विकास झाला, त्यातून जंगले कमी झालीत. अनेक ठिकाणी डोंगरही खणले गेले. त्यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडले. परिणामी पाऊस हा देखील लहरी झाला. पाऊस कधी खूप पडायचा तर कधी पडायचाच नाही, असे प्रकार सुरू झाले. त्यामुळे पावसाळ्यात येणाऱ्या पावसाने हुकमी येणारी शेती बेभरवशाची झाली. आधीच बेभरवशाची शेती आणि त्यात अपुरी जमीन त्यामुळे उत्पादन कमी होऊ लागले. सरकारने कायदे खूप केले. शेतकऱ्यांना सोयीचे व्हावे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीसारख्या व्यवस्था ही उभ्या केल्या. मात्र तिथे देखील भ्रष्टाचार बोकाळला आणि त्यात सामान्य शेतकरी भरडला गेला. त्यातही जिथे नद्यांवर धरणे बांधली गेली आणि शेतीला बारमाही पाणी मिळण्याची व्यवस्था झाली, तिथला शेतकरी मजेत राहिला. आपल्या महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्रातला शेतकरी याचे उत्तम उदाहरण राहिले. मात्र रासायनिक खतांचा अतिरेकी वापर आणि रासायनिक बियाणे यामुळे जमिनीचा पोतही खराब झाला. जिथे धरणे झालीच नाहीत तिथला शेतकरी पावसावर अवलंबून राहायचा, आणि पाऊस वेळेत न पडल्यामुळे त्याला दुष्काळाला सामोरे जावे लागायचे. कमाल जमीनधारणा आल्यावर एका कुटुंबाकडे असलेली जमीन प्रत्येक पिढीत हळूहळू कमी होत गेली. त्यातही कधी मुलीचे लग्न, तर कधी मुलाचे शिक्षण यासाठी जमीनही विकावी लागली. त्यातून शेतजमीन कमी होत गेली. परिणामी उत्पादनही कमी झाले आणि उत्पादन खर्च वाढलेला असल्यामुळे नफाही कमी झाला. त्याचा परिणाम शेतकऱ्याची दैन्यावस्था येण्यात झाला. परिणामी शेतकरी कर्जबाजारी झाला आणि त्यातूनच तो आत्महत्येकडे वळू लागला. आजच्या शेती व्यवसायाचे हे नागडे वास्तव आहे. त्यामुळेच 1980 ते 1990 या दशकात सुरू झालेल्या शेतकरी आत्महत्या हळूहळू वाढत गेल्या. आजही त्या सुरूच आहेत. त्यावर उपाय म्हणून आधी राज्य सरकारने एक पॅकेज नावाचा खुळखुळा वाजवला, तर केंद्र सरकारने दुसरा एक खुळखुळा वाजवला. शरद पवार कृषिमंत्री असताना शेतकऱ्यांची कर्जमाफी करायची घोषणा केली. मात्र त्यातही पवारांनी आपल्या क्षेत्रातल्या ओलिताची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना फायदा कसा होईल एवढेच बघितले. कोरडवाहू शेती करणारे बाराच्या भावात गेले. ती परिस्थिती आजही तशीच कायम आहे. इथे कोणीही असा प्रश्न विचारेल की यावर तर उपाय सरकारनेच करायला हवा. समाज काय करणार? बरोबर आहे, पण समाजाने ठरवले तर खूप काही करू शकतो. व्यावसायिक आणि उद्योजकांनी आपल्या परिसरातील शेतकरी कुटुंबातील प्रत्येक कुटुंबातून एका व्यक्तीला आपण रोजगार कसा देऊ शकू याचा विचार करावा. त्याचबरोबर शेतकऱ्यांना शेतीसोबत छोटे छोटे जोडधंदे कसे सुरु करता येतील याबाबत मार्गदर्शन आणि मदत करावी. शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी धनिकांनी हातभार लावावा, अशा विविध सूचनावर काहीही झाले नाही. समाज म्हणून किंवा सामाजिक संघटना म्हणून कोणीही काहीही करायला तयार नाही. आज शेतीसोबत कुक्कुटपालन, शेळीपालन, दुग्ध व्यवसाय, असे अनेक उद्योग शेतकरी करू शकतात. इतरही छोटे-मोठे व्यवसाय कुटुंबातील इतर लोक सुरु करू शकतात त्यामुळे कुटुंबाला नियमित उत्पन्न मिळू शकते. त्या दृष्टीने समाजाने हातभार लावला तर काही प्रमाणात तरी प्रश्न सुटू शकतो. इथे मुद्दा असा उपस्थित केला जाऊ शकतो की आम्ही त्यांना काय मदत करणार? किमानपक्षी अशा शेतकऱ्यांकडून तुम्ही तुमच्या गरजा भागवण्यासाठी लागणाऱ्या दूध, अंडी इत्यादी वस्तू तर बाजारभावाने खरेदी करू शकता. आज शेतकरी पिकवत असलेला भाजीपाला दलालांमार्फत आमच्यापर्यंत येतो. आम्ही दलाल बाजूला सारून थेट शेतकऱ्यांकडून आजच्या बाजारभावात माल घेण्याची व्यवस्था उभी केली तर आम्हालाही चांगला माल मिळेल आणि शेतकऱ्यालाही फायदा मिळेल. कोरोना काळात जेव्हा लॉकडाऊन होते तेव्हा नागपुरातीलच एका सामाजिक संघटनेने शेतकऱ्यांकडून थेट भाजीपाला आणून नागरिकांना पुरवण्याची व्यवस्था केली होती. समाजातल्या सुजाण नागरिकांनी विचार केल्यास आणि समाजप्रबोधन केल्यास असे अनेक उपाय सापडू शकतील. त्यातून शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारू शकेल आणि त्याच्या आत्महत्या देखील थांबू शकतील. आज भारताची लोकसंख्या 145 कोटी इतकी आहे. या सर्वांना खायला अन्न हे लागणारच आहे. त्यातील 30 ते 40 टक्के हे मांसाहारी सोडले तर बाकी शाकाहारीच आहेत. त्यांना खाण्यासाठी अन्नधान्य लागणारच आहे. हे अन्नधान्य शेतकरीच पिकवणार आहे. आज जर शेतकरी उत्पादन कमी होते म्हणून आत्महत्या करू लागला तर उद्या शेती करायला कोणीही पुढे येणार नाही. उद्या आम्हाला पोटभर अन्न खायचे असेल तर आज आम्हाला शेतकरी जगवायलाच हवा. ती आजची गरज आहे. त्या दृष्टीने प्रयत्न आजच करायला हवा. उद्या कदाचित उशीर झालेला असेल. ■ ■

बहुजन सौरभ

वकिल कायदा (सुधारणा) विधेयक 2025

# भारत सरकारचे वकिलांविरोधी षडयंत्र

*भारत सरकारच्या विधी व न्याय मंत्रालयाचे केंद्रीय कायदा मंत्री श्री. अर्जुन राम मेघवाल यांनी वकिलांच्या 1961 च्या कायद्यात सुधारणा करण्याच्या नावाखाली 'वकिल कायदा (सुधारणा) विधेयक 2025' चा मसूदा तयार केला आहे आणि त्यावर 28 फेब्रुवारी 2025 पर्यंत सूचना मागविल्या आहेत. यावरून देशभरातील वकिल बांधवांमध्ये चर्चेला उधाण आले आहे, म्हणून हा लेख मी कोणाच्याही विरोधात लिहीला नसून हा फक्त आणि फक्त वकिलांचे हित डोळ्यासमोर ठेवून लिहीला आहे. या लेखाकडे आपण सर्व वकिल बंधू भगिनींनी राजकीय, जातीय, धर्मीय, पंथीय, पक्षीय, संघटनात्मक, संस्थात्मक, व्यक्तिगत चष्मा लावून वाचू नये. या लेखाकडे अशा वेगवेगळ्या चष्म्यातून न बघता, देशभरातील तमाम वकिल बांधवांचे हित डोळ्यासमोर ठेवूनच आपण हा लेख वाचावा. वकिल बांधवांनो, विचार करा, निर्धार करा आणि भूमिका घ्या.*

**स्वातंत्र्य लढ्यात वकिलांचे योगदान :-** वकिल हा बुद्धीजीवी आहे. तो हुशार आहे. तो विवेकी आहे. तो वास्तववादी आहे. त्याला खरे खोटे, चूक बरोबर, न्यायी अन्यायी असे सारे चटकन कळतेय. म्हणून तर शेकडो वकिल बांधवांनी परकीय इंग्रजी सत्तेला या देशातून हाकलून लावण्यासाठी आणि तमाम भारतवासीयांना स्वतंत्र करण्यासाठी स्वातंत्र्याच्या लढ्यात सक्रीय सहभाग नोंदवला होता. स्वातंत्र्याच्या या लढ्यात त्याने अनेक हालअपेष्टा सहन केल्या. प्रसंगी हौतात्म्य पण पत्करले आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात तमाम स्वातंत्र्य सेनानींसह आपले योगदान दिले. अशा या वकिलांच्या कायद्यात अचानक सुधारणा करण्याचा विचार भारत सरकारच्या मनात का आला?

**कायद्यात सुधारणांची गरज काय? :-** मला असे वाटतेय की, वकिल हा शासनाचे जी. आर., निती, कायदे, धोरणे ई. हे कसे नियमबाह्य आहेत, ते संविधानाच्या चौकटीत कसे नाहीत, ते जनतेच्या कसे विरोधात आहेत, ते कसे फसवे आहेत, ते कसे देशविरोधी आहेत, यावर वकिल देशभर बोलत असतात. आपली मते मांडत असतात. त्यासाठी लिहीत असतात. त्याचबरोबर भारत सरकारने कायदेशीर संविधानिक प्रक्रिया पूर्ण न करता आपल्या मनमर्जीने बनवलेल्या कायद्यांविरोधात सुद्धा वकिल रस्त्यावर उतरून आंदोलनात सहभाग नोंदवत असतात. त्याचबरोबर सरकारच्या चुकीच्या कायदे, निती, धोरणा विरोधात न्यायालयातही ते धाव घेत असतात. तिथे कायद्यावर बोट ठेवून हे कायदे कसे बेकायदेशीर आहेत असा युक्तिवाद करीत असतात. म्हणून असे हे वकिल आहेत की जे सरकारच्या विरोधात बोलणारे, चर्चा करणारे, नागरिकांच्या कल्याणाला प्राधान्य देणारे, कायद्याच्या राज्याचे समर्थन करणारे, सरकारचे जनविरोधी रूप उघडे करणारे वकिल सरकारला नको आहेत. म्हणून त्याना विविध बंधनात बांधून ठेवून त्यांचे हक्क, आधिकार आणि स्वातंत्र्य छिनून घेण्याची भारत सरकारची ही मंशा लक्षात येते. यासाठीच वकिलांच्या कायद्यात सुधारणां करण्याच्या नावाखाली वकिलांवर विविध बंधने लादून त्यांचा आवाज दाबणे हाच या विधेयकामागचा भारत सरकारचा एकमेव उद्देश आहे हे स्पष्ट होते.

**भारत सरकारचे बीसीआय विरोधी षडयंत्र :-** वकिलांची एक स्वायत्त संस्था आहे. बीसीआय म्हणजेच 'बार कौन्सिल ऑफ इंडिया'. याद्वारे वकिलांचे हक्क, कर्तव्ये, आधिकार, दर्जा, मान, सन्मान, नैतिकता, आचरण, प्रतिष्ठा ई. सद्गुणांचे जतन केल्या जाते. न्यायालय आणि वकिल या संबंधात वकिल हे न्यायालयातील आधिकारी असतात. या गरिमाचे सुद्धा ही संस्था जतन करीत असते. बीसीआय ही संस्था स्वायत्त आणि स्वतंत्र आहे. अशा या वकिलांच्या स्वायत्तेला आणि स्वातंत्र्याला कमकुवत करून उद्धवस्त करणारे विधेयक भारत सरकार आणू पहात आहे, जे उचित नाही, म्हणून निषेधार्ह आहे. भारत सरकारचे हे विधेयक म्हणजे वकिलांच्या अस्तित्वालाच धोका आहे. लोकशाही अस्तित्वाला धोका आहे. वकिलांना सरकार धार्जिणे 'होयबा' बनविण्यासाठीच हे विधेयक आणण्यात येत आहे.



सरकार किती जरी म्हणत असले की, कायदेशीर व्यवसाय निष्पक्ष, पारदर्शक आणि सर्वांसाठी सुलभ बनविण्याच्या उद्देशाने कायद्यात बदल करण्याचा निर्णय घेतला आहे, हे म्हणणे सर्वथा चूक आहे, खोटे आहे. या निकषावर न्यायालये आणि वकिल यापूर्वी चालत नव्हते काय? मग हे प्रश्न आताच का उपस्थित केल्या जात आहेत? असे बोलून सरकार वकिलांचे संविधानिक हक्क, आधिकार, स्वातंत्र्य छिनून घेत नाही काय?

**विधेयकात या तरतुदी का नाहीत? :-** भारत सरकारला जर खरेच वकिलांच्या कल्याणासाठी विधेयकात काही सुधारणा करायच्या असतील, तर मग विधेयकात या तरतूदी का नाहीत? त्या केल्या पाहिजेत. 1) ज्यूनिअर वकिलांना महिना 25,000/- रू. स्टायफंडची तरतूद का नाही? 2) भारत सरकार, या विधेयकात सिनियर सिटीजन्स वकिलांना दरमहा पेन्शन देण्याची तरतूद का करीत नाही? 3) बार कौन्सिलकडे नोंदीत असलेल्या सर्व वकिलांकडून 1/- रू. भरून घेऊन मेडिकल क्लेम विमा पॉलिसी का काढत नाहीत? 4) वकिलाला मारहाण करणाऱ्यांच्या विरोधात अजामीनपात्र गुन्हे नोंद करण्याची विधेयकात सुधारणा का नाही? 5) वकिलांविरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल करायचा असेल तर राज्यस्तरावरील बार कौन्सिल जसे की, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अॅण्ड गोवाची परवानगी बंधनकारक आहे, असे विधेयकात नमूद का करीत नाहीत? 6) आर्थिकदृष्ट्या गरीब वकिलांचे दुर्धर आजाराने, अपघाती निधनानंतर त्यांच्या कुटुंबाला आर्थिक हातभार म्हणून भारत सरकार, राज्य सरकार आणि बार कौन्सिल ऑफ इंडिया ई. मिळून किमान एक कोटी रू.ची भरीव आर्थिक तरतूद का करीत नाहीत? 7) वकिल हे समाजाचे, कायद्याचे आणि संविधानाचे पर्यायाने देशाचा सर्वांगीण समतोल राखणारे रक्षक आहेत, त्यांचे हित का जपल्या जात नाही?



अॅड. सुभाष सावंगीकर
मो. 9325209492

**विधेयकातील या मनमानी तरतूदी काढून टाका :-** 1) विदेशातील वेगवेगळे विधी फर्म यांना भारतातील न्यायालयात वकिली व्यवसाय करण्यास मूभा देणारी तरतूद काढून टाका. 2) वकिलांनी पुकारलेल्या बहिष्कार आणि संप ई. आंदोलनावर प्रतिबंधाची कारवाईची तरतूद विधेयकातून काढून टाकण्यात यावी. 3) वकिलांवर लादलेली वाढीव आर्थिक दंडात्मक कारवाईची तरतूद या विधेयकातून काढून टाका. 4) बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या स्वायत्तेला, स्वातंत्र्याला, अस्तित्वाला, हक्क आधिकाराला आव्हान देणाऱ्या या विधेयकातील तरतूदी काढून टाका. 5) बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांव्यतिरिक्त सरकार पुरस्कृत तीन सदस्यांची मनमर्जी नियूक्ती तरतूद विधेयकातून काढून टाका. 6) बार कौन्सिल ऑफ इंडियामधे कमीत कमी दोन महिला सदस्य असाव्यात, अशी तरतूद विधेयकात करण्यात आली आहे, त्यात सुधारणा करून त्यात एस. सी., एस. टी., ओबीसी महिला आरक्षणाची तरतूद करा. 7) हे विधेयक वकिलांचा संविधानिक आंदोलनाचा आणि विरोधाचा हक्क हिरावून घेणारे आहे. 8) केंद्र सरकारला बार कौन्सिल ऑफ इंडिया वर बंधनकारक निर्देश जारी करण्याचे अधिकार बहाल करणाऱ्या या विधेयकातील तरतूदी काढून टाका. 9) बार कौन्सिल ऑफ इंडियाला 1961 च्या कायद्याने तसेच भारतीय संविधानातील आर्टीकल 19, 21, 51 ईत्यादीने जे अधिकार दिले आहेत, त्यावर हल्ला चढवून बार कौन्सिल ऑफ इंडिया कमकुवत करण्याचा आणि कालांतराने उद्धवस्त करण्याचा हा डाव आहे, तो यशस्वी होऊ न देण्याची जबाबदारी प्रत्येक वकिल बंधू भगिनींची आहे. बांधवांनो, वकिलांच्या अस्तित्वाची ही लढाई लढण्यास सिद्ध व्हा.

वकिलांच्या सर्वांगीण स्वातंत्र्यावरील हा हल्ला परतून लावण्यास सज्ज व्हा. देशभरातील वकिलांचे स्वातंत्र्य, हक्क, कर्तव्य, अधिकार अबाधित ठेवण्यासाठी एक व्हा. वकिलांची बुद्धीजीवी प्रतिमा, प्रतिष्ठा, दर्जा, मान, सन्मान, आभिमान, स्वाभिमान टिकवण्यासाठी एकजूट करा. वकिलांच्या विविध भूमिकांना कमकुवत करून उद्धवस्त करण्याचा जोरकस प्रयत्न या विधेयकाच्या माध्यमातून करण्यात आला आहे, याला विरोध म्हणून बीसीआयचे अध्यक्ष मनन मिश्रा यांनी नुकतेच केंद्र सरकारला पत्र लिहून आक्षेप व्यक्त केला आहे. दिल्ली बार कौन्सिलचे सदस्य डी. के. सिंह सह अनेक वकिल बांधव हे सर्व बार कौन्सिलच्या प्रतिनिधींना एकत्र करीत आहेत. देशभरातील वकिल बांधव या विधेयकाच्या विरोधात उभे ठाकले आहेत. राज्यभरातील आणि देशभरातील मा. तालूका न्यायालयांतील बार असोसिएशनच्या सर्व सन्माननीय वकिल पदाधिकारी, सदस्यांपासून ते सर्व वकिल बांधवांसह मा. जिल्हा व सत्र न्यायालय, मा. उच्च न्यायालय, मा. सर्वोच्च न्यायालयातील बार असोसिएशनच्या सर्व सन्माननीय पदाधिकारी, सदस्यांसह ते सर्व वकिल बांधवांनी तसेच देशभरातील विविध राज्यांच्या बार कौन्सिल बॉडीच्या सर्व सन्माननीय पदाधिकारी आणि सदस्यांसह सर्व वकिलांनी एक होऊन, आपली एकजूट करून लोकशाही आणि शांततेच्या मार्गाने, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत, केंद्र सरकारने विधेयक मागे घ्यावे म्हणून संविधानिक आंदोलन - लढ्यास सज्ज व्हावे. ■ ■

# बहुजन स्त्री वादाच्या जननी सावित्रीबाई फुले

मला खूपदा प्रश्न पडतो की सावित्रीबाई फुले आणि जोतीराव फुले यांच्या समोर कुठलाही स्थानिक आदर्श नव्हता. तरी त्यांनी सामाजिक गुलामगिरीला आव्हान देऊन अशा सनातनी वातावरणात स्त्री शिक्षणाची सुरुवात कशी केली असेल? आम्हाला जातीने, आई वडिलांनी, समाजाने वाळीत टाकले. आता मी काय करू, म्हणून ते रडत बसले नाहीत. केवढा हा स्वतः निवडलेल्या मार्गावरचा अढळ विश्वास होता? कुटुंबाने व समाजाने नाकारल्या गेलेल्या ब्राम्हण गरोदर विधवांचे बाळंतपण करण्यासाठी अनाथ बालिकाश्रम काढणाऱ्या संस्था नव्हत्या, अगदी ब्रिटिशांच्याही नव्हत्या. अगदी कुठेही त्या काळात सावित्री-फातिमा, जोतीराव -उस्मान शेख अशा हिंदू मुस्लिम मैत्रीची उत्कट उदाहरणे समाजात होती, आहेत. हा सुद्धा एक सुंदर इतिहास या जोडप्यामुळे जिवंत झाला. ज्या मैत्रीने सर्व धर्मातील सर्व जातीतील स्त्रिया, शूद्र, अतिशूद्र यांच्यासाठी शिक्षणाची बाग फुलवली. तेव्हा तर कुणीही ब्राम्हणवादी पितृसत्ते वर घणाघाती हल्ला चढवणारे एक ही उदाहरण अस्तित्वात नव्हते.

एक ही समाज मग तो ब्राम्हो असो की आर्य की प्रार्थना स्वतःच्या धर्मात राहून सुधारणा आणि स्वजाती साठी सुधारणा करण्याशिवाय संपूर्ण समाजासाठी धर्म, मनुस्मृती, परशुराम अशा प्रतिकांचे भजन करत नव्हते.एवढेच काय महात्मा फुलेंच्या काळातीलच नाही तर नंतर अगदी आजपर्यंत माझ्या सोबतीने तू शिक. तू माझ्या आधी जगाला शिक्षिका म्हणून माहिती झाली तरी मला अभिमान असेल माझे पौरुषत्व त्याने डागाळणार नाही, असे म्हणणारे एकमेव जोतीराव पती आणि बंधू उस्मान शेख आपल्याला दिसतात. आजही अशी उदाहरणे दिवा घेऊन शोधावी लागतील. आपल्या नवऱ्याला अग्नी देणारी पहिली स्त्री आणि प्लेग सारख्या साथीमध्ये जीवाची पर्वा न करता आटापिटा करत एका दलित मुलाचे प्राण वाचवणारी व स्वतःचे प्राण देणारी अशी स्त्री असे उदाहरण अजून एकही नाही. एकही उदाहरण नाही. अगदी उच्च जातीत या पूर्वी की ब्राम्हण गरोदर विधवा बाईचे बाळंतपण करून त्या अनाथ मुलाला दत्तक घेऊन डॉक्टर बनविण्याचे. बायकोला शिकवण्याचे एक उदाहरण दिले जाते. आनंदी बाई जोशींचे. तेव्हा सावित्री शिकून शिक्षिका बनून 35 वर्षे लोटली होती. पण आनंदीबाईंच्या नवऱ्याने एकीकडे डॉक्टर व्हायला अमेरिकेत पाठवले आणि रिमोट कंट्रोल आपल्या हातात ठेवला, तिने एवढ्या मायनस थंडीत साडी नेसली पाहिजे असा त्याचा कडक दंडक. कौटुंबिक व सांस्कृतिक हिंसेचा त्या बळी ठरल्या. कडाक्याच्या थंडीत साडीच नेसली पाहिजे या पती हट्टाने त्यांची अप्रत्यक्ष हत्या केली. त्या परतल्या त्या क्षय रोगाने आजारी होऊन. त्यात त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे डॉक्टर होताना सुद्धा आनंदी बाई आपण पतिव्रता कसे राहिलो पाहिजे याच विचारांनी ग्रस्त होत्या. सावित्री अशी त्याग, त्याग, खेळत बसली नाही, तिने घेतलेले व्रत ज्ञान व्रत होते आणि त्यात तिच्या नवऱ्याचा अहंकार दुखावला जात नव्हता. तर तिचा नवरा पितृसत्ताक संस्कृतीला आव्हान देत अगदी खांद्याला खांदा लावून तिच्या सोबत उभा होता. हे एक कालातीत सहजीवनाचे अपवादात्मक प्रतीक आहे. अशा नवऱ्याची उदाहरणे सापडतात का त्या काळात आपण बघू या. बायकोला शिकवण्याचे दुसरे उदाहरण दिले जाते न्यायमूर्ती रानडे यांचे. पण रमाबाई रानडे आणि त्यांच्या या पतीमध्ये त्या काळातील आजोबा नातीच्या वयाचे अंतर होते. आपल्याला त्या काळातील फुले व उस्मान शेख यांच्यापेक्षा वयाने बरोबर किंवा लहान किंवा मोठे आणि तरीही समकालीन अशा लोकहितवादी, आगरकर, चिपळूणकर, लोकमान्य टिळक यांच्यापैकी कुणी आपल्या पत्नीला किंवा बहिणीला शिकवले असे दिसते का? आणि या महानायकांच्या घरातील स्त्रियांनी 1840 ते 1900 पर्यंतच्या काळात सर्व जातीतील स्त्रियांसाठी भेदभाव न करता शाळा काढली किंवा सामाजिक कार्य सुरू केले असे आढळते का? एक अपवाद पंडिता रमाबाई यांचा. त्यांना या सर्व तत्कालीन काही सुधारकांनी आणि लो. टिळकांनी तेव्हा वाळीत टाकले होते. तेव्हाही पुण्यात महात्मा फुले व सावित्री बाई फुले यांनी त्यांचे स्वागत झाले पाहिजे अशी भूमिका घेतली. फुले स्वतः अर्धांग वायूने आजारी असताना सुद्धा त्यांनी जाहीर भूमिका घेऊन सत्सारमध्ये त्यांच्यावर लेख लिहून त्यांना पाठींबा दिला. आज ज्या समाजाला ओबीसी म्हणून आणि त्यातील स्त्रियांना केवळ अंधश्रद्धा म्हणून सरसकट धोपटत एक असे चित्र उभे केले जाते की या समाजाचे काही योगदान नाही. तर हे जाणीवपूर्वक पेरलेले एक नॅरेटीव्ह आहे. ते खास धर्मांध शक्तिनी पेरले आहे. पण आज तेच वापरले जाते आहे. फुले, आंबेडकर धृवीकरण करण्यासाठी आणि त्याचा फायदा समरसता वादी उचलत आहेत. आपल्या असे लक्षात येईल की या ब्राम्हणेतर सत्यशोधक समाजातील स्त्रियांनी या संपूर्ण देशाला वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. त्या प्रेरणा ठरल्या आहेत इतर उच्च आणि खालच्या ठेवल्या गेलेल्या जातीतील स्त्रियांसाठी. मग त्या सावित्रीबाई फुले असोत की फातिमा शेख, तारा बाई शिंदे असो की डॉक्टर रखमा बाई, तानी बाई बिर्जे असो की जनक्का शिंदे. अशा कर्तबगार स्त्रिया शूद्र समजल्या गेल्या. त्या आज ज्याला ओबीसी म्हणतात, त्याच जातीत जन्माला आल्या होत्या. त्यांनी स्वतः प्रत्येक क्षेत्रात पहिले निशाण रोवले. सर्व धर्मातील ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अतिशूद्र, भटक्या विमुक्त, आदिवासी स्त्रियांच्या मुक्तीसाठी त्या स्वतः पुढे आल्या. तेव्हा सर्वांवर सत्ता गाजवणाऱ्या ब्राम्हण समाजातील स्त्री गांजली होती, पीडित होती, शोषित होती. तिला आणि दलित स्त्रीला दोघींना एकाच वेळी ओबीसी जातीतील स्त्री ने मुक्त केले.



स्त्री दास्याचा तुरुंग फोडते....

लता प्रतिभा मधुकर
मो. 9922320338



बहुजन सौरभ

या ओबीसी समाजातील पहिल्या स्त्रीवादी कर्तृत्ववान, सत्यशोधक स्त्रियांची प्रेरणा आहेत. शेतकरी कुटुंबातील सावित्रीबाई. तिने अंधाराच्या मातीत ज्ञानाचे बीज पेरले आणि देशभरातील स्त्रिया ज्ञान वृक्षाची फळे चाखू लागल्या आणि सावित्रीबाई ला विसरून मिथकातील सरस्वती पुजायला लागल्या. कारण ब्राम्हण आणि त्रिवर्णातील स्त्रियांना त्यांच्या शिक्षणाची दारे एका ओबीसी समाजातील स्त्रीने, एका मुस्लिम स्त्रीने उघडले हे वास्तव जिव्हारी लागले. त्यांनी खूप शोधून पाहिले, पण त्यांना एक ही ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य समाजातील स्त्री सती विरोधात, केशवपन विरोधात लढताना दिसली नाही. त्यांच्यासाठी लढल्या त्या बहुजन समाजातील स्त्रिया आणि म्हणून भारतातील आधुनिक स्त्री मुक्ती आणि आधुनिक स्त्री वाद हा फुलेंच्या काळात 19 व्या शतकात सुरू होतो. बहुजन स्त्रीवादाने जन्म दिला. भारतातील स्त्री वादी चळवळीला. त्या स्त्री वादाची व स्त्री मुक्ती चळवळीची जननी आहे सावित्री बाई फुले आणि जनक महात्मा जोतीराव फुले. 1 जानेवारी 1847 साली पुण्यामध्ये या देशातील स्त्रियांच्या शाळेची पहिली घंटा जिने वाजवली त्या आमच्या प्रथम ज्ञानदात्रीची जयंती. तू होतीस म्हणून मी आज शिकले सावित्री. तुला उर भरून मिठी आणि विनम्र अभिवादन!!! ■ ■

# असहिष्णूंच्याबाबतीत उदारता

**एकदा तथागत बुद्ध आळवक यक्षाच्या राज्यात आळवीनगरीत रहात होते. तेव्हा आळवक तथागताकडे आला व म्हणाला 'श्रमणा चालता हो.' मित्रा, ठिक आहे. असे म्हणून तथागत तेथून निघाले. तेव्हा यक्ष बोलला, 'श्रमणा आत ये.' तथागत आत आले व म्हणाले, 'मित्रा ठीक आहे.' पुन्हा यक्ष त्यांना म्हणाला, 'श्रमणा चालता हो.' 'मित्रा. ठीक आहे?' असे म्हणून तथागत बाहेर गेले.**

यक्ष त्यांना म्हणाला, 'श्रमणा. आत ये.' तथागत आत येता येता म्हणाले, 'मित्रा ठीक आहे.' पुन्हा तिसऱ्यांदा यक्ष म्हणाला, 'हे श्रमणा. चालता हो.' 'ठीक आहे मित्रा.' असे म्हणत तथागत निघाले. 'हे श्रमणा. आत ये' यक्ष पुन्हा म्हणाला. 'ठीक आहे मित्रा' असे म्हणत तथागत प्रवेश करते झाले. चौथ्यांदा सुद्धा तो यक्ष आळवक तथागतांस म्हणाला, 'हे श्रमणा चालता हो.' यावेळी मात्र तथागत उत्तरले, 'मी निघून जाणार नाही. तुला वाटेल ते तू करावे.' हे श्रमणा मी तुला एक प्रश्न विचारतो. जर तू माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. तर मी तुझी बुद्धी भ्रष्ट करेन. मी तूला वेडा करीन. तुझे हृदय फाडून टाकीन किंवा तुझे पाय पकडून नदी पलीकडे फेकून देईन.' क्रोधित होऊन यक्ष बोलला. 'हे मित्रा माझी बुद्धी भ्रष्ट करू शकेल किंवा मला वेडा करू शकेल किंवा माझे हृदयाचे तुकडे करू शकेल किंवा माझे पाय पकडून मला नदीपलीकडे फेकून देऊ शकेल. असा मला तरी कोणी दिसला नाही. तरीही मित्रा. तुला प्रश्न विचारावयाचा असेल तर आवश्यक विचारावा.' त्यानंतर यक्ष आळवोकाने तथागतांना पुढील प्रश्न विचारला.



बहुजन सौरभ

'इहलोकी माणसा करीता सर्वश्रेष्ठ धन कोणते? कोणती कुशल कर्म सुखदायक आहेत? रसात मधुरतम रस कोणता? कोणत्या प्रकारचे जीवन सर्वश्रेष्ठ जीवन म्हटले जाते?' तथागत उत्तरले, 'या इहलोकी श्रद्धा ही सर्वश्रेष्ठ धन होय. सुचरित धम्म सुखदायक आहे. सत्याचा रस हा सर्व रसात मधुरतम होय आणि प्रज्ञापूर्ण जीवन हे सर्वश्रेष्ठ जीवन होय. यक्ष आळवकाने विचारणा केली. 'माणूस पूर कसा पार करतो? माणूस (भव) सागर कसा पार करतो? माणूस दुःखाचा अंत कसा करतो?' तथागत उत्तरले, 'श्रद्धेने माणूस पूर पार करतो. माणूस सावधान चित्ताने सागर पार करतो. माणूस प्रयत्नाने दुःखाचा नाश करतो. माणूस प्रज्ञेने परिशुद्ध होतो.' यक्ष आळवकाने विचारणा केली, 'माणसाला ज्ञान कसे प्राप्त होते? माणसाला धन कसे प्राप्त होते? माणसाला कीर्ती कशी लाभते? माणसाला मित्र कसे लाभतात.? इलोकांतून परलोकी जाताना माणसाला पश्चाताप केव्हा होत नाही?' निर्वाण प्राप्तिकरीता रताप्रती आणि धम्माप्रती श्रद्धा ठेवून आज्ञापालनाने अप्रमादी सावधान चित्त माणूस ज्ञान प्राप्त करतो. 'जो कुशल कर्म करतो. जो दृढ निश्चयी आहे. जो सावधान चित्त आहे. त्यालाच धन प्राप्त होते. जो देतो त्याला मित्र लाभतात.' 'ज्या श्रद्धावान उपासकात सत्य, सदाचार, धैर्य आणि औदार्य आढळते त्याला मृत्यूनंतर पश्चाताप होत नाही.' इकडे ये! दुसरे श्रमण ब्राह्मण आहेत. त्यांनाही विचारणा करावी की सत्य. स्वनियंत्रण. दानशीलता आणि धैर्य याशिवाय दुसरे अधिक श्रेष्ठ जीवन आहे काय? यक्ष आळवक वदला, 'मी दुसऱ्या श्रवण ब्राम्हणांना का विचारणा करावी? आज माझ्या भावी कुशल मंगलाचे मला ज्ञान झाले आहे.' 'खरेच बुद्ध माझ्या कल्याणास्तवच मालवी येथे वास्तव्याला आले आहेत. आज मी जाणले आहे की कुणाला (दान) दिल्याने श्रेष्ठतम फळाची प्राप्ती होते.' 'तथागता, मी आजपासून तथागतांना आणि त्यांच्या धम्माला वंदन करून गावागावात नगरा नगरात चारिका करणार.' आणि आळवक बुद्धाचा शिष्य बनला. ■ ■

अमृतवाणी ही बुद्धाची



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

# आर्यअष्टांगिक मार्ग

## शील

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात लिहिल्याप्रमाणे, भगवान बुद्ध म्हणतात, 'प्रत्येक माणसाने शीलाची ही पाच तत्त्वे मान्य करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण, प्रत्येक मनुष्य जे जे काही करतो त्याचे मुल्यमापन करण्यासाठी त्याच्यापाशी काही एक परिमापन असले पाहिजे की ज्याच्यामुळे तो आपल्या चांगल्या अथवा वाईट वर्तवणुकीचे मोजमाप करू शकेल आणि माझ्या शिकवणुकीप्रमाणे हीच पाच तत्त्वे किंवा शीले माणसाच्या चांगल्या अथवा वाईट कृतीचे मोजमाप करण्याचा मापदंड आहे. जगात पतितांचे दोन वर्ग असतात. ज्यांच्यासमोर काही आदर्श आहेत असे पतित आणि ज्यांच्यासमोर कोणताच आदर्श नाही असे पतित. ज्यांच्यासमोर कोणताच आदर्श नाही अशा पतिताला आपण पतित आहोत हेच कळत नाही. त्यामुळे तो नेहमीच पतित राहतो. याउलट ज्यांच्यासमोर एखादा आदर्श आहे, असा पतित आपल्या पतितावस्थेतून वर येण्यासाठी प्रयत्न करीत असतो. कारण त्याला आपण पतित आहोत हे त्याला माहित असते. जीवनाचा आदर्श म्हणून हीच तत्त्वे आदर्श आहेत. ही तत्त्वे व्यक्तीच्या हितासाठी आणि सामाजिक हित साधणारी आहेत.' शील म्हणजे नीतिमत्ता. जो नीतिवान आहे, जो नीतिने चालतो, बोलतो, वागतो त्याला आपण शीलवान म्हणतो. शील म्हणजे माणसाच्या मनाची अशी घडण की ज्यामुळे मनुष्य पापकर्मापासुन, अकुशल कर्मापासुन दूर राहतो. तो कुशल कर्म करतो. तथागत बुद्ध धम्मपदाच्या एकशेत्र्यांशीव्या गाथेत म्हणतात,

'सब्ब पापस्स अकरणं, कुसलस्स उपसंपदा !
सचीत्त परियोदपनं, एतं बुद्धांन सासनं !!'

याचा अर्थ, कोणतेही पाप न करणे, शुभ कर्म करणे, वाईट चित्ताला परिशुद्ध ठेवणे, हीच बुद्धाची शिकवण आहे.



बहुजन सौरभ

भाग 32

अकुशल कर्म :- तीन प्रकाराचे आहेत. 1) कायिक, 2) वाचिक व 3) मानसिक

कायिक अकुशल कर्मात पुढील प्रमाणे तीन कर्मे येतात. 1) हिंसा करणे, 2) चोरी करणे व 3) व्यभिचार करणे. वाचिक अकुशल कर्मात पुढील प्रमाणे चार कर्मे येतात. 1) खोटे बोलणे, 2) चुगली-चहाडी करणे, दुसऱ्याची निंदा करणे 3) शिव्या देणे, कटू बोलणे व 4) व्यर्थ, बाष्कळ बडबड करणे. मानसिक अकुशल कर्मात पुढील प्रमाणे तीन कर्मे येतात. 1) लोभ करणे, 2) द्वेष करणे व 3) मोह, मिथ्या दृष्टी बाळगणे. अशा प्रकारे दहा अकुशल कर्मे आहेत.

कुशल कर्म :- तसेच कुशल कर्म तीन प्रकाराचे आहेत. 1) कायिक, 2) वाचिक व 3) मानसिक

कायिक कुशल कर्मात पुढील प्रमाणे तीन कर्मे येतात. 1) अहिंसा म्हणजे मैत्री व करुणा, 2) अचोरी म्हणजे दान करणे व 3) अव्यभिचार म्हणजे संतुष्ट राहणे.

वाचिक कुशल कर्मात पुढील प्रमाणे चार कर्मे येतात. 1) सत्य बोलणे, 2) चुगली-चहाडी न करणे, दुसऱ्याची निंदा न करणे 3) शिव्या न देणे, कटू न बोलणे, प्रिय बोलणे व 4) व्यर्थ, बाष्कळ बडबड न करणे, यथायोग्य बोलणे.

मानसिक कुशल कर्मात पुढील प्रमाणे तीन कर्मे येतात. 1) अलोभ करणे, 2) अद्वेष करणे व 3) अमोह असणे, मिथ्या दृष्टी न बाळगणे. अशा प्रकारे दहा कुशल कर्मे आहेत.

कर्म कोणत्या हेतूने केले, त्यावर ते कर्म कुशल आहे की अकुशल आहे ते अवलंबून आहे. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करीत असताना एखादा रोगी मरण पावला तर त्याला अकुशल कर्म म्हटल्या जाणार नाही. परंतु एखाद्यांनी जर कुणाच्या पोटात सुरा खुपसून त्याला मारले असेल तर ते अकुशल कर्म होईल.

निंदा न करणे, नेहमी जागृत राहणे, रात्रंदिवस मनाला नियंत्रणात ठेवणे, निर्वाणासाठी नेहमी प्रयत्नशील राहणे, वाणीचा संयम बाळगणे इत्यादी कुशल कर्मे धम्मपदात सांगितले आहे.

कुशल कर्माबाबत भगवान बुद्ध धम्मपदाच्या त्रेपन्नाव्या गाथेत म्हणतात-

'यथापि पुप्फरासिम्हा कबिरा मालागुणे बहूं।
एवं जातेन मच्चेन कत्तब्बं कुसलं बहुं ॥'

याचा अर्थ, ज्याप्रमाणे कोणी पुष्पराशीतून माळांचे सर (हार) करावेत, त्याप्रमाणे जगात जन्माला आलेल्या प्राण्यांनी अनेक कुशल कर्मे करावीत.

तसेच धम्मपदात पन्नासाव्या गाथेत सांगितले आहे की-

'न परेसं विलोमानि न परेसं कताकतं।
अत्तनो'च अवेक्खेय्य कतानि अकतानि च ॥

याचा अर्थ, ना दुसऱ्याच्या दोषाला, ना दुसऱ्याच्या कृत-अकृत्याला बघावे. (माणसाने फक्त) आपल्याच कृत-अकृत्याला बघावे.

भगवान बुद्धांची शिकवण



आर. के. जुमळे
93264 50506

■ ■ क्रमशः

## महत्वाचे

### महाबोधी महाविहार बुद्धगयाच्या समर्थनार्थ आज एक दिवसीय धरणे आंदोलन



**नागपूर :** हिवरीनगर येथील तथागत बुद्ध विहार येथे बोधगया येथे सुरू असलेल्या महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाला समर्थन देण्यासाठी तथागत धम्म प्रचार संघ यांनी 26 फेब्रुवारी 2025 ला सकाळी 11 वाजता एक दिवसीय धरणे प्रदर्शन कार्यक्रम आयोजित केला आहे. सदर कार्यक्रमाला दीक्षाभूमी बचाव संघर्ष समिती भारतीय बौद्ध महासभा आणि अशा विविध संघटना सहभागी होणार आहे. आपण सर्वांनी निवेदन आहे बोध गया मुक्ती आंदोलन सशक्त करण्यासाठी या आंदोलनाला हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे.

### इंदिरा गांधी महाविद्यालयात नेत्रदान जनजागृती



**कळमेश्वर :** इंदिरा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालय कळमेश्वर येथे आज राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मरणोपरांत नेत्रदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र कांबळे यांनी मरणोपरांत नेत्रदान यासारख्या जीवनरक्षक देणग्यांच्या माध्यमातून होणाऱ्या सकारात्मक परिणामाबद्दल जागरुकता वाढविण्यासाठी विद्यार्थी वर्गाने हातभार लावून राष्ट्रीय सेवाभावी कार्यात सहभागी व्हावे असे मार्गदर्शन करतांना मत प्रतिपादित केले. यावेळी विद्यार्थीना नेत्रदानाचे महत्व व सहभाग याबाबत सुचना व चुकीचे भ्रम याबाबत प्रा. रोशन भगत, प्रा. सुकन्या घाटोले यांनी कार्यक्रमात माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. किशोर दुर्गे यांनी केले तर आभार प्रा. चेतन ठवरे यांनी मानले. मरणोपरांत नेत्रदान जनजागृती कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

### लोटस पब्लिक स्कूल येथे निरोप समारंभ



**नागपूर :** न्यू नेहरू नगर, म्हाळगी नगर चौक, येथील लोटस पब्लिक स्कूल येथे वर्ग 10 वी च्या शालांत परिक्षेत बसणाऱ्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून ॲड. डॉ. रमेश पिसे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव प्रा. नाना शेंडे होते. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब यांच्या फोटोला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. या प्रसंगी विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर विविध कार्यक्रमांचे जसे बलूनगेम्स, डान्स, संगीत खुर्ची इ.चे आयोजन करण्यात आले. विशेषतः वर्ग 8 वी 9 च्या विद्यार्थ्यांनी वर्ग 10 वी च्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले. शाळेतर्फे वर्ग 10 वी च्या विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ. रमेश पिसे यांनी विद्यार्थ्यांना अमूल्य मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. नाना शेंडे यांनी परिक्षेच्या पूर्व तयारी संबंधी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. डॉ. सरोज आगलावे, दिनकर वाठोरे, हरेश्वर सहारे यांनीही विद्यार्थ्यांना या प्रसंगी परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या प्राचार्या कांचनलता नागदेवे यांनी केले. संचालन सहाय्यक शिक्षिका सोनाली खोब्रागडे आणि दामिनी वरखडे या विद्यार्थीनीने केले. तर आभार शरमीन बेग या विद्यार्थीनीने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्या अरूणा डहाके, प्रभारी पायल शंभरकर, महेश हरडे, प्रज्ञा रामटेके, आरती सपकाळ, पुजा लक्केवार, प्रतिभा अतकरे, सुनिता मेश्राम, सुवर्णा हरले, वैशाली राऊत, दिपीका सोमकुंवर, किरण दुर्लेवार, अपर्णा भोयर आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपले योगदान दिले. शेवटी सुरूचि भोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महापुरुषांना जाती-पातीच्या चौकटीत बंदिस्त करू नका : डॉ. नागेश गवळी



**नागपूर :** महापुरुषांना जाती-पातीच्या चौकटीत बंदिस्त करणे म्हणजे त्यांच्या विचारांचा सर्वात मोठा अपमान आहे. त्यांच्या कार्याचा, विचारांचा आणि कृतीचा अंगीकार करून सशक्त राष्ट्रनिर्मिती करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध शिव व्याख्याते डॉ. नागेश गवळी यांनी केले.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण व पारेषण कंपनी नागपूर परिमंडळ, छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव समितीतर्फे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधिक्षक अभियंता राकेश जनबंधू होते. तर, अधिक्षक अभियंता अमित परांजपे आणि मधुकर घुमे यांनी अतिथी म्हणून कार्यक्रमाची शोभा वाढवली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रातील महत्त्वाच्या घटना, त्यांचे प्रेरणादायी विचार आणि स्वराज्याच्या स्थापनेसाठी त्यांनी केलेला संघर्ष यावर डॉ. गवळी यांनी प्रकाश टाकला. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महापुरुष कोणत्याही एका जातीचे नव्हते. त्यांनी एकमेकांना पाहिले नसले, तरी ते विचारांनी एकरूप होते. छत्रपतींच्या समाधीचा शोध घेत त्याचे जिर्णोद्धार करायचे काम आणि महाराजांवरील पहिला पोवाडा रचायचे. काम ज्योतीबांनी केले होते, तर दुसरा पोवाडा शाहीर अमर शेख यांनी केला होता. शिवरायांचा पोवाडा रशियाच्या चौकाचौकांतून गायचे काम साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी केले होते. 'जय शिवराय' ही घोषणा देण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. हे सर्व महापुरुष वेगवेगळ्या जाती धर्मातील होते, पण हे सर्व महापुरुष एका विचारांचे होते. त्यांनी कधीच जाती आधारित काम केले नाही, तर जातीपातीच्या भिंती त्यांनी पाडल्या. मानवतेचा पुरस्कार आणि समाजाला समतेचा विचार देण्याचे काम त्यांनी केले. परंतु, आम्ही आज त्यांना एका विशिष्ट जातीच्या चौकटीत बंदिस्त करतो आहोत, अशी खंत व्यक्त करीत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महामानव आज आमच्यातून निघून गेले आहेत, पण त्यांचे विचार आजही तुमच्या-आमच्यामध्ये जिवंत आहेत. पण हा विचार आज केवळ पुस्तकातच बंदिस्त राहतो आहे की काय, असा प्रश्न आमच्यासमोर उभा राहायला लागला आहे. त्यांचे पुतळे आज आम्ही गावोगावी-चौकाचौकांत उभे केले आणि या चौकाचौकांतून आपण आपल्या महामानवांना वाटून घेण्याचे काम केल्याचे सांगून ते पुढे म्हणाले की, महामानवांच्या विचारांना या चौकटीबाहेर काढण्याची गरज आहे.

> " छत्रपती शिवरायांनी अठरापगड जाती धर्मातील लोकांना जमा करून स्वराज्य निर्माण केले. पण त्यांना मात्र याच स्वराज्यातील काही लोकांनी जातीपुरते वाटून घेतले.
> - डॉ. गवळी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना लिहिताना शिवरायांच्या रयतेच्या राज्याचा आणि लोकप्रशासनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला. या महाराष्ट्राचा इतिहास घोड्यांच्या टापाने, विजांच्या कडकडाटाने, ढगांच्या गडगडाटाने, सह्याद्रीच्या ढालीने, शाहीरांच्या टपाने, मावळ्यांच्या रक्ताने आणि छत्रपती शिवरायांच्या तळपत्या तलवारीने लिहिला गेला आहे. त्यामुळे त्यांच्या विचारांचे, संस्कारांचे अंगिकार करण्याचे आवाहन डॉ. गवळी यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक नरेंद्र तिजारे यांनी, संचालन अमित पेढेकर यांनी, तर आभार प्रदर्शन सुभाष मुळे यांनी केले.




तथागत बुद्ध विहार, जयहिंदनगर, बहादूरा, नागपूर, भदंत डॉ. धम्मोदय यांनी या विहारात जागा दान दिली. सध्या डॉ. धम्मोदय भंतेजी इथे वास्तव्याला आहेत.

संवाद मित्र
प्रीती तिरपुडे, मो.7972119871

### विपस्सना केंद्र त्रिमूर्तीनगर येथे पालि परीक्षा प्रमाणपत्राचे वितरण



**नागपूर :** बुद्ध विहार समन्वय समिती तर्फे झालेल्या पालि भाषा परीक्षेत विपस्सना केंद्र त्रिमूर्तीनगर या परीक्षा केंद्रातून बसलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरवातीला तथागत गौतम बुद्ध आणि परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. त्यानंतर बुद्ध वंदना घेऊन मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दामोदर वाहने यांनी केले. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते इंजि. ए.के. पाटील यांनी बुद्ध विहार समन्वय समिती तर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षेसंदर्भात इत्तंभूत माहिती दिली. त्यात ते म्हणाले, आपण वंदना म्हणतो, पण त्यातील प्रत्येक शब्दाचा आपल्याला अर्थ माहित नाही. मग हाच मुद्दा पकडून सामान्य माणसाला वंदनेचा अर्थ समजला पाहिजे असा विचार केला व समितीने पहिले पुस्तके शब्दार्थ सहित बुद्ध वंदना हे काढले व त्यावर पहिली परीक्षा 2017 ला घेतली आणि पाली भाषेत बोलता यावे या उद्देशाने आठ परीक्षेचा कोर्स तयार केला. आजपर्यंत सहा परीक्षा झालेल्या आहेत. अजून दोन परीक्षा शिल्लक आहेत. त्या झाल्यावर समिती काही लोकांना पालि शिकवण्यासाठी तयार करेल व विहारा विहारात पालीचे वर्ग सुरु करण्याचा प्रयत्न करेल. यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रात परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 10852 आणि महाराष्ट्राबाहेर बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या 300 च्या जवळपास आहे. धम्म सहली पवनी, रामदेगी, मन्सर, सालबर्डी, गोठणगांव, भद्रावती, सीरपूर या ठिकाणी उत्खनन आणि शिलालेख दर्शनासाठी नेलेल्या आहेत हे सुद्धा यांनी सांगितले. जास्तीत जास्त लोकांनी पालि परीक्षेला बसावे. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. खुशाल घोडेस्वार यांनी सर्वांना पास झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या व पुन्हा असेच यशस्वीत यश मिळवावे असे आवाहन केले. प्रमुख अतिथी अजाबराव पाटिल यांनी सुद्धा सर्वांना पालिभाषा परीक्षेला बसून सहकार्य करावे असे आवाहन केले. डॉ एन.एस. मेश्राम यांनी सूचना केली कि, प्रत्येक विहारात पालीचे वर्ग झाले पाहिजेत. यानंतर मान्यवरांचे हस्ते परीक्षेला बसलेल्या उपासक उपासिकांना प्रमाणपत्र देऊन त्यांना प्रोत्साहित करण्यात आले. एकूण 39 विद्यार्थ्यांपैकी 26 विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन दामोदर वाहने यांनी केले, तर आभार प्रदर्शन स्मिता मेश्राम यांनी केले. धम्मापालन गाथा मोटघरे व सुजाता देशभ्रतार, लक्ष्मी लोखंडे यांनी म्हटले. यशस्वीतेसाठी वाहने, अजाबराव पाटील, डॉ. खुशाल घोडेस्वार, स्मिता मेश्राम, प्रीती गजघाटे, अर्चना शेंडे, अंजली घानगडे, बोधले यांचे सहकार्य लाभले.



छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विचारमंच आणि सत्यशोधक नेदरलँड्स यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्साहात साजरी.



### 'घर घर बहुजन सौरभ' अभियान

**नागपूर :** नागपूर शहरात आंबेडकरी चळवळीचे एकमेव वृत्तपत्र 'दैनिक बहुजन सौरभ' आहे. कोरोना काळात लावलेले बहुजन सौरभचे रोपटे पाचव्या वर्षात बहरत आहे. कारण जन्मापासून या वृत्तपत्राच्या वाढीस खतपाणी घालण्याचे कार्य मुख्य संपादक डॉ. सिद्धार्थ कांबळे, निवासी संपादिका संध्या राजुरकर, कार्यकारी संपादक विलास गजभिये आणि बहुजन सौरभचा परिवार सतत प्रयासरत आहे. कोणत्याही वृत्तपत्राची वाढ होण्यास वाचक तितकेच महत्वाचे असतात. आंबेडकरी चळवळीस बहुजन सौरभचे महत्व लक्षात घेऊन 16 डिसेंबर 2024 पासून 'धम्मसंगोष्टी' आणि बहुजन मैत्री संघा तर्फे दर सोमवारी 'घर घर बहुजन सौरभ' अभियान सुरु केले आहे. दिनांक 24 फेब्रुवारी 2025 रोजी शिल्पा सोसायटी, नरेंद्र नगर परिसरात बहुजन सौरभ विषयी वरील अभियान राबवण्यात आले. या अभियानाच्या आयोजनामध्ये श्रीराम बनसोड, धर्मेश प्रसेनजीत, भगीरथ मेश्राम, प्रा. यशवंत दुपटे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या प्रसंगी डॉ. भीमराव घोडेस्वार, दर्शना जंगले, डॉ. प्रशांत दुबे, सुहास ढोले, नागसेन गायकवाड, प्रकाश गजभिये, दिनेश अग्ने, अश्विन देवगडे, श्रावण शेंडे, श्रीकांत शेंडे, राहुल तामगाडगे, धनंजय वराडे, सुरेश कळबे, एस. व्ही. सोनटक्के, लीला पांडुरंग गजघाटे, मिलिंद पाटील, महेंद्र नगराळे, संतोष हाडके या सर्वांच्या प्रत्यक्ष घरी जाऊन दैनिक बहुजन सौरभचे महत्व समजाऊन सांगितले. सर्वांनी आपल्या घरी दैनिक बहुजन सौरभ सुरू करण्याचे आश्वासन दिले.



### साता समुद्रा पलीकडे शिवजयंती उत्साहात साजरी

**संवाद मित्र ज्योत्सना बनसोड, अलमाटी :** दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये शिवाजी जयंती साजरी केली. कॅस्पियन इंटरनॅशनल स्कूल ऑफ मेडिसिन, अलमाटी, कझाकिस्तान, येथे सुद्धा भारतीय वंशाच्या, वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी, शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी केली. या कार्यक्रमाचे आयोजन, महाराष्ट्र, केरळ तामिळनाडू, आंध्र प्रदेश, राजस्थान, येथील वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेत असलेले, भारत वंशी, सीनियर, जूनियर मुले-मुली मिळून करण्यात आले. प्रथम शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण आणि दीप प्रज्वलित करून शिवाजी महाराजांच्या जयघोषाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यामध्ये मुला मुलींनी महाराष्ट्रीयन वेशभूषा धारण केले. लुगडे, शेरवानी, फेटे घातले. तर कुणी पोवाडे, कुणी गीते तर जूनियरने आणि सीनियरने मिळून डान्स सादर केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित छोटीशी लघुनाटिका सादर करण्यात आली. शिवाजी महाराजांचा वारसा परदेशात सुद्धा टिकवला जात आहे. यावरून याची प्रचिती येते. एकंदरीत जल्लोषात शिवजयंती साजरी करण्यात आली.

### सुजाता भोंगाडे यांना समाजभूषण पुरस्कार प्राप्त



**नागपूर :** सामाजिक कार्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सुजाता भोंगाडे यांना राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय पुरस्काराने पहाट फाऊंडेशनच्या वतीने समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. समाजातील वंचित घटकातील घरकामगार, परित्यक्ता महिला, कोरोना एकल महिलासाठी व त्यांच्या हितासाठी सातत्याने संघर्ष करून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यातून समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्नशिल आहात म्हणून हा पुरस्कार शेगाव येथील वर्धमान महावीर जैन भवन, जिल्हा बुलढाणा येथे आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील पहाट फाऊंडेशनचे संचालक अमोल भिलगे, अर्पिता सुरडकर, मिसेस इंडिया विजेते श्वेता परदेशी, प्रशिद्ध साहित्यिक व व्याखते प्रा. संजय गायकवाड, महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य नंदकुमार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथील प्राचार्य आर. एन. गावित यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोशनी गंभीर, प्रीती नाकतोडे, आरती बोरकर, अनुपमा कावळे, प्रज्योती तावडे, प्रफुल्लता बनसोड व विलास भोंगाडे यांनी अभिनंदन केले आहे.

### चैतन्य युवा पुरस्कार जाहीर

**चंद्रपूर :** राष्ट्रसंत विचार साहित्य परिषद केंद्रीय समितीच्या वतीने देण्यात येणारे चैतन्य युवा पुरस्कार जाहीर करण्यात आलेले आहे. केंद्रीय समितीची व आणि संमेलन आयोजन समितीची नुकतीच सभा चंद्रपूर येथे झाली. सदर पुरस्कार राष्ट्रसंत साहित्य विचारकृती संमेलन सांगडी (जि. आदिलाबाद) येथे येत्या 6 व 7 मार्च रोजी मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप मानपत्र व गौरवचिन्ह, शाल असे आहे. पुरस्कारासाठी खालील मान्यवराची निवड करण्यात आलेली आहे. विनायक सोयाम (पंचाळा), पालीकचंद बिसणे (सिंदीपार), सतीश देवाळकर (अंतरगाव-खुर्द), भालचंद्र पारटकर (सांगडी), सचिन झाडे (माजरी), श्रीनिवास खाडे (कोब्बई) या सहा जणांना जाहीर झालेला आहे. निवड झालेल्या सर्व मान्यवरांचे संमेलन



समितीच्या वतीने भाऊ पत्रे, बळीराम बोबडे, संजीव पोडे, महेश सावलानी, नारायण सहारे, इंजि. विलास उगे, श्रीकांत धोटे, डॉ. गावंडे, विलास चौधरी, देवराव कोंडेकर, स्वागताध्यक्ष प्रभाकरजी नवघरे, संजय तिळसमृतकर, शिवाजी भेदोडकर, भूमा रेड्डी, ॲड. राजेंद्र जेनेकर, प्रा. नामदेव मोरे, महेंद्र दोनोडे, प्रेमलाल पारधी, आदींनी अभिनंदन केले आहे.

## जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क
९३२५६२९६३५

# अभिरूची अकॅडमी रामटेकच्या मुली क्रिकेट स्पर्धेत उपविजेता

**नागपूर :** जिल्हा स्तरीय महिला क्रिकेट स्पर्धेत अभिरूची अकॅडमी, रामटेकच्या मुली उपविजेता ठरली. मातृका फाऊंडेशन, रामटेकद्वारा आयोजित क्रिकेट स्पर्धेत 5 महिला संघ आणि 12 मुलींची संघ सहभागी झाली. त्यात अत्यंत चुरशीच्या लढतीत उपविजेता ठरली. अभिरूची अकॅडमी, रामटेक शेवटची बॉलपर्यंत रोमांचक थरार शेवटी अरोली बाजी मारली. रामटेक येथे 22 ते 23 फेब्रुवारी 2025 रोजी संपन्न झाली.



सोनू बेठेकर (आंतरराष्ट्रीय खेळाडू) प्रत्येक खेळ कोणत्याही स्पर्धा असो त्या स्पर्धेत अभिरूची अकॅडमी, रामटेकची एक संघ तयारच असतात. निःशुल्क सेवा व्हॉलिबॉल प्रशिक्षण आणि मैदानी खेळ क्रिकेट, सद्या प्रशिक्षण देण्यात येते. त्यांची शिक्षण हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे झाल्यामुळे क्रीडामध्ये मुले-मुलींना मैदानात आणण्याची रुची निर्माण करते. सध्याची स्थिती पाहता मोबाईल फोन वापरण्यामुळे आळशी होत चालले. मैदानाकडे दुर्लक्ष होत असतांना सोनू बेठेकर यांनी स्वतःला समर्पण केले. रामटेक येथील मुले असो किंवा मुली सर्व खेळाडू अर्धा तास तरी मैदानात दिसेल. असे त्यांचे संकल्प आहे. त्यामुळे आजारला निमंत्रण देऊ शकत नाही.

मातृका फाऊंडेशन रामटेकचे अध्यक्ष. डॉ. अंशुजा किंमतकर यांनी अभिरूची अकॅडमी रामटेक टीम ए साठी गणवेशची व्यवस्था केली आणि अभिरूची अकॅडमी, रामटेक क्र संघ साठी नागपूर विद्यापीठ चे दोन प्राध्यापक टी शर्ट त्यांच्याकडून देण्यात आले. समाजसेवा मध्ये नेहमीच अग्रेसर असते आणि दोन्ही संघाला टोपी ची व्यवस्था भारतीय रेल्वे विभाग नागपूर येथे कार्यरत असलेले रोशन राऊत, विश्वास गायकवाड, गिरीश बोरकर सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळख यांनी दोन्ही संघाला टोपी देणगी दिली.

मागील वर्षी एक संघाची सहभागी करून आणि या वर्षी दोन संघाला सहभागी नोंदणी करून अत्यंत परिश्रम करून कमी कालावधीत संघाची बांधिलकी करून अभिरूची अकॅडमी, रामटेकची संघ उपविजेता ठरली. अभिरूची टीमसाठी अथक परिश्रम मुख्य भूमिका रूपम पोकळे, बहादूर चव्हाण यांनी प्रशिक्षण दिले.

मागील दहा वर्षापासून निःशुल्क सेवा क्रीडामध्ये त्यांचे मुख्य भूमिका असते.

### बिरसा मुंडा आदिवासी कल्याण महासंघाचे मंत्री अशोक उईकेंना निवेदन



**नागपूर :** बिरसा मुंडा आदिवासी महासंघाच्या वतीने अध्यक्ष भाऊ कुलसंगे यांनी कचरागड येथे आदिवासी विकासमंत्री नामदार अशोक उईके यांची भेट घेऊन आदिवासींच्या विविध मागण्यांची पूर्तता करण्याबाबत एक लेखी निवेदन सादर केले. त्यांच्या खालीलप्रमाणे मागणी अशा आहे की, आदिवासी विभागातील आश्रम शाळेत अकरावी, बारावी वर्गाला मंजुरी देण्यात आली. परंतु शिक्षकांची भरती करण्यात आली नाही. त्या शिक्षकांच्या भरती त्वरित करण्यात याव्या. सुराबर्डी येथील गोंडवाना संग्रहालयामध्ये कामाचे भूमिपूजन करून त्वरित करण्यात यावे. खऱ्या आदिवासींच्या 12,500 जागा त्वरित भराव्या. या संदर्भात उच्च व सुप्रीम कोर्टाने आदेश दिले आहे. पेसा भरती केलेल्या उमेदवारांना रोजंदारीवर न ठेवता त्यांना कायम सवेत समाविष्ट करावे. केंद्रावरती अर्थसंकल्पीय बजेट अंतर्गत प्रकल्पस्तरावर राबविण्यात येणाऱ्या योजनांवर सध्या 50 हजाराची मर्यादा आहे. ती वाढवून 2 लाख रुपये करण्यात यावी. असे मागणीचे निवेदन दिले आहे. आदिवासी सेवक रमेश उईके तसेच केशर शहा, दादाकांत गायकवाड, रमेश आडे हे उपस्थित होते. असे संघटन सचिव प्रदीप धुर्वे यांनी प्रसिद्धी पत्रकात कळविले आहे.

## स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648